# महाराष्ट्र विधानपरिषद
## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## सोमवार, दिनांक ९ जुलै, २०१८
## (दुपारी १२.०० वाजता)

**एक : नवनिर्वाचित सदस्यांचा शपथविधी.**

**दोन : प्रश्नोत्तरे.**

**तीन : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे -**

**वने मंत्री** : "महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ यांचा सन २०१६-२०१७ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**चार : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना – (असल्यास).**

**पाच : लक्षवेधी सूचना – (म.वि.प. नियम १०१ अन्वये) –**

(अ) **(गुरुवार, दिनांक ५ जुलै व शुक्रवार, दिनांक ६ जुलै, २०१८ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित लक्षवेधी सूचना) – (अनुक्रमांक (१) ते (५)) –**

(१) **सर्वश्री. हेमंत टकले,** धनंजय मुंडे, सुनिल तटकरे, अमरसिंह पंडित, नरेंद्र पाटील, किरण पावसकर, आनंद ठाकूर, ॲड. राहुल नार्वेकर, श्री. विक्रम काळे, ॲड. जयदेव गायकवाड, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री. सतिश चव्हाण, प्रकाश गजभिये, जगन्नाथ शिंदे, अरुणकाका जगताप, ख्वाजा बेग, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"गुंतवणुकदारांना दरमहा बिटकॉईनच्या स्वरुपात १५ टक्के लाभांश देण्याच्या आमिषाने कोल्हापूर, सांगलीसह पश्चिम महाराष्ट्र व उत्तर कर्नाटकातील बड्या उद्योग व्यावसायकांसह अनेक नोकरदारांना कोट्यवधी रुपयाचा गंडा घालण्याऱ्या झिपकॉईन क्रिप्टो या कथित कंपनीच्या तीन मोठ्या भागीदारांकडून सर्वसामान्य लोकांची ३५ ते ४० कोटी रुपयांची केलेली फसवणूक, इंटरनॅशनल डिजिटल कंपनी असल्याचे भासविल्याने झटपट पैसे कमावण्याच्या मोहाला बळी पडलेल्या अनेक व्यावसायकांनी केवळ विश्वास व मिळणाऱ्या लाभांशाला बळी पडून स्वत:ची फसवणूक करुन घेणे, आतापर्यंत या कंपनीच्या तीन भागीदारांना अटक करण्यात पोलिसांना आलेले यश, चौकशीत या कंपनीची व्याप्ती १५ देशात असल्याचे व झिपकॉईन

क्रिप्टो कंपनीने ८००० लोकांची फसवणूक करुन ६५ कोटी रुपयांचा गंडा घातल्याचे निदर्शनास येणे, गेन बिटकॉईन्स या कंपनीने नागरिकांची २ हजार कोटी रुपयांची फसवणूक केल्याचे प्रकरण उघडकीस आल्यानंतर माहे मे, २०१८ मध्ये पुन्हा फ्लिनस्टोन कंपनीने मनीट्रेड कॉईन्सच्या माध्यमातून राज्यातील नागरिकांची आर्थिक फसवणूक केल्याचे प्रकरण समोर आलेले असणे, ठाणे व मुलुंड भागात मनी ट्रेड कॉईन्स या कंपनीने ५०० कोटी रुपयांची फसवणूक केल्याच्या तक्रारी स्थानिक नागरिकांनी पोलिसांकडे केलेल्या असणे, तथापि, या प्रकरणी अद्याप गुन्हेगारांचा शोध घेऊन पोलिसांनी त्यांना अटक केलेली नसणे, त्याचा फायदा घेऊन कंपनीचा मालक दुबईत पळून गेल्याची माहिती उघड होणे, अनेक गुंतवणुकदारांनी तर पोटाला चिमटा देवून व आपल्याकडे असलेल्या सेवानिवृत्ती अथवा थोड्याफार प्रमाणात साठवून ठेवलेल्या रक्कमेपैकी काही रक्कम अथवा सर्वच रक्कम या कंपनीमध्ये लाभाशांच्या रक्कमेच्या अभिलाषेने गुंतविलेल्या रक्कमा अशाप्रकारे बुडल्याने त्यांच्या मनात निर्माण झालेले चिंतेचे व भितीचे वातावरण लक्षात घेता शासनाने या कंपनीच्या अनेक गैरकारभाराबद्दल चौकशी करण्याची नितांत गरज असल्याने शासनाने याबाबत तातडीने करावयाची कारवाई वा उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

(२) **सर्वश्री. बाळाराम पाटील,** जयंत पाटील, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"उरण तालुक्यातील (जि.रायगड) जेएनपीटी, सिंगापूर पोर्ट आणि येथे असलेल्या इतर बंदरांमध्ये नोकर भरतीमध्ये प्रकल्पग्रस्त आणि स्थानिकांवर नेहमी होत असलेल्या अन्यायाच्या निषेधार्थ नोकरी व व्यवसाय बचाव समिती, उरण (जि.रायगड) यांनी दिनांक २ फेब्रुवारी, २०१८ रोजी सिंगापूर पोर्ट वर महामोर्चा काढण्यात येणे, जेएनपीटी बंदराच्या उभारणीसाठी उरण तालुक्यातील प्रकल्पग्रस्तांनी आपल्या जमिनी कवडीमोल किंमतीत दिलेल्या असून आज त्याच प्रकल्पग्रस्तांना नोकरीपासून वंचित ठेवण्यात येवून भूमिपुत्रांवर अन्याय करण्यात येणे, सिंगापूर पोर्ट मधील कॅप्टन मृत्युंजय धवन सहीत ११३ परप्रातियांना नोकरी वरून त्वरीत काढणे, सिंगापूर पोर्ट मध्ये १८ गाव प्रकल्पग्रस्त व तालुक्यातील नोकर भरती करावी, मेडिकल झालेल्या ८० व ७०० प्रकल्पग्रस्तांना त्वरीत नोकरी देणे, कस्टम खात्यांनी जारी केलेली डी.पी.डी.धोरणाची अधिसूचना रद्द करावी, सिंगापूर पोर्टने नविन शेवा, हनुमान कोळीवाडा, पाणजे,

जसखार या गावांना दत्तक घ्यावे, प्रकल्पग्रस्तांसाठी वयाची अट ३४ वर्ष व शिक्षणाची अट दहावी करावी, जेएनपीटी व सिंगापूर पोर्ट बाधित मच्छीमारांना नुकसान भरपाई देण्यात यावी, एन.एस.आय.जी.टी. (३३० मिटर) बंदरात (डि.पी.वर्ल्ड) भरती केलेल्या ४०० परप्रांतीय कामगारांना त्वरीत काढून टाकणे व प्रकल्पग्रस्त व स्थानिकांची भरती करावी, जेएनपीटी बंदराच्या अंतर्गत येणाऱ्या इतर बंदराने सी.एस.आर. फंडाचा वापर प्रकल्पग्रस्त गावांच्या विकासासाठी करावा इत्यादी मागण्या करण्यात येणे, डी.पी.डी. धोरणामुळे हजारो स्थानिक बेरोजगार होणार असल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली असणे, सबब सदर प्रकल्पग्रस्त व स्थानिकांना न्याय देण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(३) **प्रा. अनिल सोले,** सर्वश्री. नागोराव गाणार, गिरीशचंद्र व्यास, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"नागपूर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयात (मेडीकल) येथे सन २००३ मध्ये गर्भजल परिक्षण केंद्र सुरू करण्यात येणे, पूर्व विदर्भात मोठ्या प्रमाणात सिकलसेलचे रूग्ण आढळून येणे, परंतु नागपूर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय येथील महिला सिकलसेल रूग्णासाठी सुरू झालेले गर्भजल परिक्षण केंद्र गेल्या ५ वर्षापासून बंद असणे, त्यामुळे महिलेच्या गर्भातील बाळाला सिकलसेल आहे किंवा नाही हे तपासण्यास कोणतीही उपाययोजना नसणे, त्यामुळे शेकडो रूग्ण परिक्षणापासून वंचित होणे, शासनाने लाखो रूपयांच्या मशीन खरेदी करूनही त्या धूळखात पडल्या असणे, त्यातच टेक्निशियन व तज्ज्ञ डॉक्टरांची असलेली रिक्त पदे, आरोग्य विभागाकडून शासनास सिकलसेल अनुसंधान केंद्राचा प्रस्ताव मंजूरीकरीता पाठवूनही त्यास अद्यापही न मिळालेली मंजूरी, त्यामूळे पूर्व विदर्भातील सिकलसेल रूग्णाचे परिक्षणाचा निर्माण होणारा अभाव, शासनाचे याकडे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची उपाययोजना."

(४) **श्री. रविंद्र फाटक, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **जलसंपदा मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"पालघर जिल्ह्यातील सूर्या धरणाचे पाणी असंख्य गावाचा विरोध असतांनाही अन्यत्र वळविण्याचा घाट राज्य शासनाने घातल्याचे नुकतेच माहे एप्रिल, २०१८ मध्ये उघडकीस येणे, सूर्या धरणाचे पाणी पालघर जिल्ह्याबाहेर नेण्यासाठी पाईपलाईनचे सर्वेक्षण आणि ड्रिलिंगचे

काम  मेढवण आणि सोमटा या गावांच्या हददीत सुरु करण्यात येणे, पालघर जिल्ह्यातील शेती आणि बागायतीला पुरेसे पाणी मिळत नसल्याने येथे कायमची दुष्काळी परिस्थिती असतांना सूर्या धरणाचे पाणी इतरत्र वळविण्यास पालघरवासियांचा तीव्र आंदोलन करण्याचा दिलेला इशारा, वेळोवेळी आंदोलने करुनही याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी सूर्या पाणी बचाव संघर्ष समितीने दिनांक ३ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास मा.मुख्यमंत्री महोदयांकडे सादर केलेले  निवेदन, सदर प्रकरणी अद्यापी कोणतीच कार्यवाही न होणे, परिणामी ग्रामस्थांमध्ये पसरलेले तीव्र असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

(५) **सर्वश्री. संजय दत्त,** शरद रणपिसे, अशोक ऊर्फ भाई जगताप, अमरनाथ राजूरकर, रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, सर्वश्री. धनंजय मुंडे, अनिकेत तटकरे, सुनिल तटकरे, हेमंत टकले, अमरसिंह पंडित, सतिश चव्हाण, किरण पावसकर, ॲड. राहुल नार्वेकर, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उद्योग मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"कोकणातील नाणार राजापूर येथील (जि.रत्नागिरी) येथील स्थानिक नागरिकांच्या विरोधाकडे दुर्लक्ष करुन सौदी अरेबिया येथील अरामको या कंपनीशी पेट्रोकेमिकल ग्रीन रिफायनरी प्रकल्पाचा केंद्र सरकारने करार केल्याचे दिनांक १३ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास येणे, नाणार प्रकल्पाला स्थानिक जनतेने विरोध दर्शविला असणे, नाणार प्रकल्पाला स्थानिक जनतेचा असलेला विरोध केंद्राला कळवून रिफायनरी प्रकल्प रद्द करुन घेतो असे आश्वासन मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिले होते, मा.उदयोग मंत्री महोदयांनी या प्रकल्पाच्या भूसंपादनाची अधिसूचना रद्द करण्याची घोषणा केली होती परंतु मा.मुख्यमंत्री महोदयांनी सदरील अधिसूचना रद्द केल्याने  नाणार प्रकल्पाबाबत संभ्रमाचे वातावरण निर्माण होणे,राजापूर तालुक्यातील नाणारसह पंचवीस गावांमध्ये राज्य आणि केंद्र सरकारने प्रस्तावित रिफायनरी प्रकल्प आणण्याचा घाट घालण्यात येणे, राजापूर तालुक्यातील जि.रत्नागिरी नाणार येथे पेट्रोकेमिकल रिफायनरी प्रकल्प प्रस्तावित असून या प्रकल्पातील १४ गावांतील  स्थानिकांचा ठाम विरोध असून येथील प्रातांनी कोणत्याही कायद्याचा आधार न घेता जमिनी देण्याबाबत सहमती दर्शविण्यासाठी नोटीसा बजावल्या त्याला कोणीही प्रतिसाद दिला नसून ९७ टक्के लोकांनी असहमती पत्रे

शासनाकडे व मुख्यमंत्री यांचेकडे सादर केली असणे, या प्रकल्पामुळे ७ हजार ४७६ घरे ६३ देवदेवतांची मंदिरे १५ ते २० पाणवठे नेस्तनाबूत होणार असणे तर हजारो झाडांची लागवड असलेल्या आंबा व काजूच्या बागा नष्ट होणार असणे, नाणारसह अन्य सर्वच गावांतून या प्रकल्पाविरोधात मोठ्या प्रमाणावर जनमत तयार होणे, आंबा बागायती क्षेत्र असलेल्या या नियोजित प्रकल्पस्थळी जनतेने सातत्याने आंदोलनाच्या माध्यमातून विरोध दर्शविला असणे, राज्य सरकारने भूसंपादनाचे काम हाती घेतले असणे तेव्हा हा विरोध अधिक तीव्र होणे, नाणार परिसरातील प्रत्येक कुटूंबातून या प्रकल्पाला विरोध होत असणे, जमीन खरेदीच्या माध्यमातून रिफायनरी प्रकल्पातील दुकानदारी मोठया प्रमाणात सुरु असणे, या भागातील जनतेकडून होणारा तीव्र विरोध लक्षात घेता शासनाने सदरील प्रकल्पाबाबत आपली भूमिका स्पष्ट करुन या प्रदूषणकारी प्रक्रियेला होणारा स्थानिकांचा विरोध लक्षात घेता शासनाने हा प्रस्तावित प्रस्ताव रद्द करण्याची आवश्यकता, शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(ब) (शुक्रवार, दिनांक ६ जुलै, २०१८ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित लक्षवेधी सूचना)** – **(अनुक्रमांक (१) ते (४))** –

(१) **डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"अहमदनगर महानगरपालिकेच्या प्रभाग क्र. ३२ चे नगरसेवक यांचेवर खूनाचा आरोप सिध्द झाल्याने व त्यांचे नगरसेवक पद रद्द झाल्याने पोट-निवडणूकीच्या प्रचारादरम्यान दिनांक ७ एप्रिल, २०१८ रोजी संजय कोतकर व वसंत ठुबे यांची गोळया घालून हत्या करण्यात येणे, सदरील घटनास्थळी शिवसैनिक व नातेवाईक जमा झाल्यावर सदरील ठिकाणांची लाईट बंद करण्यात येणे, तसेच त्यांचे गुंड कार्यकर्ते जमा होऊन दगडफेक करुन दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करुन घटनास्थळावरुन जाण्याची धमकी देण्यात येणे, जेणेकरुन प्रेतांची विल्हेवाट लावून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न करणे, या गुन्ह्यातील आरोपी स्थानिक लोकप्रतिनिधी यांची जामिनावर मुक्तता झाल्याने राजकीय दबाव आणून सदरील प्रकरण दडपण्याचा होत असलेला प्रयत्न, परिणामी अहमदनगर जिल्हयातील सर्वसामान्य नागरिकांमध्ये निर्माण झालेले भितीचे व दहशतीचे वातावरण, तसेच जिल्ह्यात सार्वजनिक ठिकाणी, बसेस यामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे

लावण्याची आवश्यकता, त्याचबरोबर शासनाने सदरील प्रकरणी निःपक्षपातीपणे कारवाई करण्याकरिता सरकारी वकील म्हणून श्री.उज्वल निकम यांची नियुक्ती करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(२) **सर्वश्री. धनंजय मुंडे,** सुनिल तटकरे, अमरसिंह पंडित, हेमंत टकले, सतिश चव्हाण, सुजितसिंह ठाकूर, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **अन्न व औषध प्रशासन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्याच्या विविध महानगर, शहरांमध्ये असलेल्या मल्टिप्लेक्स चित्रपट गृहात, महागार्मावरील फुडमॉल, विविध मॉल्स यामध्ये खाद्यपदार्थांची ज्यादा दराने विक्री करून जनतेची लूट करण्यात येत असल्याची बाब माहे जून २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास येणे, प्रेक्षकांना मल्टिप्लेक्स चित्रपट गृहांमध्ये घरचे किंवा बाहेरचे खाद्यपदार्थ घेऊन जाण्यास बंदी असणे, सुरक्षेच्या नावाखाली बॅगा तपासुन त्या बाहेरच ठेवण्यात येणे, पिण्याच्या पाण्याची सोयही मल्टिप्लेक्स चित्रपट चालक आणि खाद्यपदार्थ विक्रेत्यांकडुन केली जात नसणे, खाद्यपदार्थांचे दर अव्वाच्या सव्वा लावण्यात येत असणे, १० रूपयांचे पॉपकॉर्न २५०/- रूपयांना आणि १५ रूपयांची पाण्याची बॉटल ५० रूपयांना विकणे, छापील किंमत असलेल्या वस्तु त्याच दरात विकणे बंधनकारक असताना त्याचे उल्लंघन केले जात असणे, कायद्याने चित्रपटगृह चालकांना खाद्यपदार्थांबाबत सक्ती करण्याचा कोणताही अधिकार नसताना ते मनमानी करत असणे, ज्येष्ठ नागरिक, मधुमेह वगैरेसारख्या आजाराने ग्रस्त व्यक्तींना तसेच लहान मुलांना ठराविक काळानंतर कायम अन्नप्राशन करावे लागत असणे, चित्रपट गृहामधील खाद्यपदार्थ त्यांच्या प्रकृतीला मानवणारे नसले तरी त्यांना बळजबरीने आणि तेही चढ्या दराने विकत घ्यावे लागत असणे, मा.मुंबई उच्च न्यायालयाने एका याचिकेदरम्याने महागड्या पदार्थांवर शासनाचे नियंत्रण का  नाही असा सवाल उपस्थित करून राज्य शासनाला फटकारले असणे, सामान्य जनतेची मल्टीप्लेक्स मध्ये होणारी लूट, मल्टीप्लेक्स, मॉल्स, फुडमॉल्स मधील खाद्यपदार्थांच्या किमतीवर नियंत्रण ठेवण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याप्रकरणी शासनाने करावयाची कार्यवाही व भुमिका."

(३) **आर्कि. अनंत गाडगीळ,** सर्वश्री. आनंदराव पाटील, अशोक ऊर्फ भाई जगताप, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **पर्यावरण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"पुणे शहरात सध्या वाढलेले वायु प्रदुषण, वाढत्या प्रदुषण पातळीमुळे वाढलेले श्वसनाचे विकार, प्राथमिक लक्षणांमध्ये सर्दी, खोकला व दम लागत असणे, याशिवाय क्रॉनिक ऑब्स्ट्रक्टीव्ह पल्मोनरी डिसीजचे वाढलेले प्रमाण, लहान मुलांमध्ये न्युमोनिया आणि फुफ्फुसाच्या कर्करोगाचे वाढत असलेले वाढते प्रमाण, गेल्या पाच वर्षात येथील लहान मुलांची श्वास घेण्याची कमी झालेली क्षमता व श्वसन विकारामध्ये दहा टक्क्यांनी झालेली वाढ, याकडे शासन करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी येथील जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना त्यावर शासनाने येथील वायु प्रदुषण नियंत्रणात आणण्यासाठी तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(४) **सर्वश्री. नागोराव गाणार,** प्रा. अनिल सोले, सर्वश्री. गिरीशचंद्र व्यास, परिणय फुके, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सामाजिक न्याय मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील बहुचर्चित शिष्यवृत्ती घोटाळयाच्या चौकशीमध्ये राज्य शासनाचा हस्तक्षेप टाळण्यासाठी सीबीआय मार्फत चौकशी करण्यात यावी या मागणी संदर्भात दृष्टीत बहु. शिक्षण पर्यटन व पर्यावरण विकास संस्थेने उच्च न्यायालयात याचिका दाखल केलेली असणे, या दाखल याचिकेनुसार मा. न्यायालयाने राज्य शासन, विशेष तपास पथक आणि संबंधित प्रतिवादींना नोटीसा बजावून १४ फेब्रुवारी पर्यंत उत्तर सादर करण्याचे आदेश दिलेले असणे, त्यानुसार राज्य शासनाने ९७७.२४ कोटी रुपयांचा घोटाळा आढळून आल्याचे व पडताळणी प्रक्रिया अद्यापही सुरू असल्याचे तसेच अनधिकृत शिष्यवृत्ती उचलणाऱ्या शिक्षण संस्थांवर वसुलीच्या नोटीस जारी केल्या असल्याचे प्रतिज्ञापत्र मा. उच्च न्यायालयात सादर केलेले असणे, या प्रकरणी नागपूर विभागाच्या जनप्रतिनिधींनी दिनांक ३ फेब्रुवारी, २०१८ रोजी शासनास निवेदन पाठवून सदरहू गैरव्यवहाराची चौकशी सीबीआयमार्फत करण्याची मागणी केलेली असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**सहा : म.वि.प. नियम १०१ — अ अन्वये विशेष उल्लेख — (असल्यास).**

# - मध्यंतर -

**सात : सन २०१८-२०१९ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा (पहिला दिवस.)**

**खालील मंत्र्यांच्या मागण्यांवर चर्चा होईल.**

**१.** मुख्यमंत्री.

२. गृहनिर्माण मंत्री.

३. ग्रामविकास, महिला व बाल विकास मंत्री.

४. आदिवासी विकास मंत्री.

५. अन्न व नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण, अन्न व औषध प्रशासन, संसदीय कार्य मंत्री.

६. परिवहन, खारभूमी विकास मंत्री.

७. सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री.

८. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री.

९. जलसंधारण, राजशिष्टाचार, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग कल्याण मंत्री.

आठ : **शासकीय विधेयक —**

**महसूल मंत्री यांचा प्रस्ताव (म.वि.प. नियम १४९ अन्वये) —**

"महाराष्ट्र विधानसभेने संमत केलेले "**सन २०१८ चे वि.स.वि. क्रमांक ८ - महाराष्ट्र भूमिगत नळमार्ग व भूमिगत वाहिन्या (जमिनीमधील वापर हक्काचे संपादन) विधेयक, २०१८**" मागे घेण्यास अनुमती द्यावी."

---

नऊ : **(गुरुवार, दिनांक ५ जुलै, व शुक्रवार, दिनांक ६ जुलै, २०१८ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) —**

**सर्वश्री. धनंजय मुंडे,** शरद रणपिसे, सुनिल तटकरे, संजय दत्त, हेमंत टकले, जयंत पाटील, अशोक ऊर्फ भाई जगताप, कपिल पाटील, प्रा. जोगेंद्र कवाडे, सर्वश्री.सतिश चव्हाण, विक्रम काळे, रामहरी रुपनवर, चंद्रकांत रघुवंशी, दत्तात्रय सावंत, अमरसिंह पंडित, किरण पावसकर, ॲड. जनार्दन चांदुरकर, डॉ. सुधीर तांबे, श्रीमती.विद्या चव्हाण, श्रीमती. हुस्नबानू खलिफे, सर्वश्री.अनिकेत तटकरे, ख्वाजा बेग, आर्कि.अनंत गाडगीळ, सर्वश्री.बाळाराम पाटील, अमरनाथ राजुरकर, सुभाष झांबड, प्रकाश गजभिये, ॲड.राहुल नार्वेकर, सर्वश्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, हरिसिंग राठोड, आनंदराव पाटील, जयदेव गायकवाड, रामराव वडकुते, जगन्नाथ शिंदे, अमरिशभाई पटेल, मोहनराव कदम, आनंद ठाकूर, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

"राज्यातील शेतकऱ्यांसाठी जाहीर झालेल्या छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेची घोषणा होऊन एक वर्ष उलटल्यानंतरही अद्यापपर्यंत शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळालेला नसणे, वन टाईम सेटलमेंटअंतर्गत

शेतकऱ्यांनी रक्कम भरुनही त्यांच्या खात्यात कर्जमाफीची रक्कम जमा न होणे, कर्जमाफी योजना फसल्यामुळे त्याचा परिणाम शेतकऱ्यांना नव्याने मिळणाऱ्या पीक कर्जावर होणे, पीककर्जासाठी कागदपत्रांची संख्या वाढविल्यामुळे व पीक कर्ज मिळत नसल्यामुळे शेतकरी त्रस्त असणे, पीक कर्जासाठी बँकांकडून शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणावर अडवणूक केली जात असणे, बँकांकडून पीककर्ज मिळत नसल्यामुळे शेतकऱ्यांवर सावकाराच्या दारात जाण्याची वेळ येणे, पीक कर्जासाठी शेतकऱ्यांच्या पत्नीकडे शरीरसुखाची मागणी करण्यापर्यंत बँक अधिकाऱ्यांची मजल जाणे, त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये संतापाची तीव्र भावना निर्माण झालेली असणे, पीक विमा नुकसानभरपाई रक्कम आणि इतर शासन अनुदान रकमा शेतकऱ्यांना वाटप न करता बँकांनी नफेखोरी करणे, गतवर्षी कापसावर आलेल्या बोंडअळीच्या संकटामुळे शेतकऱ्यांना जाहीर केलेली ३७ हजार ५०० रुपये प्रति हेक्टरी मदत अद्याप मिळालेली नसणे, पुढील हंगामासाठी बोंडअळीचा संभाव्य धोका वर्तविला जाणे, बोगस बी.टी.बियाणांची सर्रास विक्री होणे, यामुळे शेतकऱ्यांमध्ये भीतीची भावना निर्माण झालेली असणे, धानाची नुकसानभरपाई, तुडतुड्या रोगामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई मिळालेली नसणे, सन २०१६ च्या अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना जाहीर केलेली मदत मिळालेली नसणे, मागील वर्षीच्या तूर, हरभरा विक्रीचे चुकारे शेतकऱ्यांना अद्याप मिळालेले नसणे, खरेदीअभावी लाखो क्विंटल तूर, हरभरा शेतकऱ्यांकडे पडून असणे, शासकीय खरेदी केंद्र बंद झाल्याने तूर व हरभरा उत्पादक शेतकऱ्यांना बेभावाने विक्री करावी लागत असणे, त्यामुळे प्रति क्विंटल त्यांना एक ते दीड हजार रुपयांचा तोटा सहन करावा लागत असणे, विक्रीसाठी नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांना अनुदान देण्याची घोषणा करुनही अद्याप सदर अनुदान मिळालेले नसणे, उत्पन्नावर अधिक ५० टक्के हमीभाव देण्याची घोषणा करुनही तो हमीभाव मिळत नसणे, चारही बाजूने आलेल्या या सरकारनिर्मित संकटांमुळे शेतकऱ्यांवर आत्महत्यांची वेळ येणे, कर्जमाफीची घोषणा झाल्यानंतरही एका वर्षात सुमारे १ हजारहुन अधिक आत्महत्या झालेल्या असणे, धर्मा पाटील यांच्या मुलाला दिलेल्या आश्वासनाची अंमलबजावणी न करणे, आदिवासी व शेतकरी संघटनांच्या विविध मागण्यांबाबत मुख्यमंत्री महोदयांनी सभागृहात दिलेल्या आश्वासनांची अंमलबजावणी न होणे, मार्च, २०१७ पर्यंतच्या पेड पेंडिंग ग्राहकांना अद्याप कनेक्शन न मिळणे, संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्याची आवश्यकता असणे, सरसकट कर्जमाफी देऊन सध्याच्या कर्जमाफी योजनेत झालेल्या अनियमिततेची चौकशी करण्यासाठी सर्वपक्षीय आमदारांची समिती नेमणे, बोंडअळीग्रस्त शेतकऱ्यांना ५० हजार रुपये हेक्टरी मदत देण्याची आवश्यकता, पुढील हंगामासाठी बोंडअळीचा संभाव्य धोका

वर्तविला गेला असल्यामुळे बोंडअळी प्रतिबंधक उपाययोजना व बोगस बी.टी. बियाणांच्या विक्रीवर नियंत्रण आणण्याची आवश्यकता, पीक कर्ज न देणाऱ्या बँकांवर तातडीने कारवाई करण्याची गरज, तूर, हरभरा विक्रीचे चुकारे देऊन भावांतर योजनेप्रमाणे शेतकऱ्यांना बाजारभाव व हमीभावातील फरकाची रक्कम त्यांच्या बँक खात्यात जमा करण्याची होत असलेली मागणी, राज्यातील शेतकऱ्यांच्या दृष्टीने अशा अनेक अतिशय महत्वाच्या विषयांवर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**दहा : अर्धा-तास चर्चा — म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी) -**

**(१) श्री.किरण पावसकर, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"राज्यात मुंबईसह प्रमुख शहरांत अन्न भेसळीच्या घटना घडत असणे, प्रामुख्याने दूधासह अन्य खाद्य पदार्थ, फळे, भाज्या, खाद्यतेल यामध्ये भेसळ अधिक होत असल्याचे वारंवार निदर्शनास येत असणे, याबाबत अन्न व औषध प्रशासनाकडे असलेली अपुरी साधनसामुग्री व कर्मचारी यामुळे भेसळीच्या प्रकरणात वाढ होत असणे, अन्न व औषध कायद्यांतर्गत असलेली शिक्षा व दंड प्रभावी ठरत नसल्याने वारंवार अशी प्रकरणे घडत असणे, यामध्ये बदल करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना."

**(२) श्री.रविंद्र फाटक, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"ठाणे सिव्हील रुग्णालयात ऑपरेशन थिएटर, सोनोग्राफी आणि इतर विविध कक्षात गैरसोयी व अस्वच्छता असल्याचे माहे जून, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास येणे, प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे एका अल्पवयीन मुलीवर बलात्कार झाल्याची घटना, तर बर्न वॉर्डमध्ये असताना सुरक्षारक्षकाने एका महिला रुग्णाशी केलेले असभ्य वक्तव्य, नवजात अर्भकाचे अपहरण होणे, रुग्णालयामध्ये चोरीच्या घटना घडणे, सद्य:स्थितीत सुरक्षेसाठी मजुरांची रोजंदारीवर नियुक्ती करण्यात येणे, ५० सुरक्षारक्षक देण्याचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असणे, रुग्णालयामधील असुरक्षेमुळे गर्दुल्ल्यांचे प्रमाण वाढलेले असणे, बेकायदा पार्किंगचा प्रश्न निर्माण होणे, उक्त सिव्हिल रुग्णालयात गोरगरीब रुग्ण नेहमीच उपचारार्थ येत असून त्यांना चांगल्या सोयी-सुविधा मिळत नसणे, रुग्णांना मुंबईतील शासकीय रुग्णालयात नेण्याची सोय नसल्याने अनेकदा रुग्णांचा रस्त्यातच मृत्यू होणे, या रुग्णालयाचे सुपर स्पेशालिटी रुग्णालय करण्याचा प्रस्ताव मंजूरी अभावी प्रलंबित असणे, रुग्णालयात वैद्यकिय अधिका-यांची पदे रिक्त असून जिल्हयातील वरिष्ठ वैद्यकिय अधिकारी सेवानिवृत्त होत असल्याने रिक्त पदांच्या संख्येमध्ये वाढ झाली असणे, रिक्त पदांचा वाढत चाललेला आलेख, रुग्णालयातील वैद्यकिय

अधिकारी, परिचारिका व अन्य पदे त्याचबरोबर सुरक्षा रक्षकांची पदे भरण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**विधान भवन,**
नागपूर,
दिनांक : ७ जुलै, २०१८.

**डॉ.अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.